MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात



मा. आमदार रमेश कदम साहेब यांची कन्या सिद्धी ताई रमेश कदम यांना मोहोळ मतदार संघातून शरद पवार राष्ट्रवादीची तुतारी कडून उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल हार्दिक हार्दिक शुभेच्छा व वडवणी तालुक्यातील रमेश कदम युवा मंच बीडच्या वतीने वडवणी मध्ये साहित्यरत्न लोकशाहीर आणणाभाऊ साठे या चौकात फटाके फोडण्यात आले

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -४१ | सोमवार दि.२८ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -41 | MONDAY DT.28 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# प्रकाश सोळंकेचं घर फुटलं रमेश आडसकरांचा शरद पवाराच्या राष्ट्रवादीने गेम केला आता मोहन जगतापांना फायदाच फायदा


## आ. प्रकाश सोळुंखेचं घर हे फुटलं जगजाहीर जयसिंह सोळंके अजित पवारांना भेटण्यासाठी समर्थकांचा ताफा घेऊन गेले आमदार प्रकाश सोळंकेच्या चुलत्या पुतण्या कोण बनेगा आमदार म्हणून भांडण मतदारसंघात चर्चेला उधाण!

## ज्येष्ठ नेतेमंडळी व लाभार्थी आ. प्रकाश सोळुंके यांना लढायला सांगत आहे तर युवा तरुण वर्ग जयसिंह सोळंके यांना लढा म्हणून सांगत आहे लढणार नेमकं कोण अजून स्पष्ट नाही?











## मोहन जगतापांना २०२४ चा आमदार करण्यासाठी माजलगाव मधील जनता सरसावली

## माजलगाव मध्ये सोळंके चुलत्या पुतण्यामध्ये वाद रमेश आडसकरांचा शरद पवारांच्या राष्ट्रवादीने केलेला गेम मोहन दादांच्या पत्त्यावर पडणार.

**प्रतिनिधी ।** माजलगांव

येत्या २० नोव्हेंबर रोजी राज्यांमध्ये विधानसभा निवडणूक संपन्न होत आहे यासाठी अवघे दोन दिवस आधी शिल्लक असून २९ ऑक्टोबर पर्यंत फॉर्म भरायचा आहे त्यामुळे ज्यांना तिकीट मिळाले नाही अशांची मोठी धांदल उडाली असून या ठिकाणी आणि जण अपक्ष चा फॉर्म भरून मोकळे होत आहेत असाच काही प्रकार माजलगाव मतदारसंघात सुद्धा आता कठीण प्रसंग पाहायला मिळत आहे या ठिकाणी महायुतीच्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून जागा सुटले असून त्या ठिकाणी विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांची वर्णी अजित दादा पवार यांच्या गटाकडून लागलेली असताना त्यांचा पुतण्या जिल्हा परिषद सदस्य जयसिंह सोळंके यांनी काल माजलगाव मतदार संघातून अनेक गाड्याचा ताफा अजित दादा पवार यांची भेट घेण्यासाठी बारामती येथे समर्थकांसह ताफा घेऊन गेल्यामुळे तरुण वर्ग हा जयसिंह सोळंके यांच्या सोबत आहे तर ज्येष्ठ नेतेमंडळी व प्रकाश दादा सोळंके यांचे लाभार्थी समर्थक जे की गुत्तेदारीसाठी प्रकाश सोळुंकेच्या पुढे पुढे करतात अशी लोक जयसिंह सोळंकेंना डावलून प्रकाश सोळंकेचं नाव चर्चेत आणत आहेत अनेक जण जयसिंह सोळुंखे यांचे नाव घेत आहेत परंतु त्या ठिकाणी आ. प्रकाश सोळंकेने

**जयसिंह सोळंके यांचा पाठीत खंजीर खुपसल्याची चर्चाही माजलगाव मतदार संघामध्ये ऐकायला मिळत आहे.**

शरद पवारांच्या राष्ट्रवादी मध्ये भाजपाचे नेते भावी आमदार रमेश आडसकर यांनी जाहीर रित्या प्रवेश केला परंतु या ठिकाणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीने भाजपा नेते रमेश आडसकर यांचा गेम केलाअशी चर्चा माजलगाव मतदारसंघांमध्ये ऐकायला मिळत आहे या ठिकाणी मोहन जगताप यांना शरद पवारांच्या राष्ट्रवादीने उमेदवार म्हणून घोषित केले खरे परंतु आता अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतून उमेदवारी मिळालेले आ. प्रकाश सोळंके यांची पुतणे हे ऐकायला तयार नाहीत त्यामुळे माजलगाव मतदारसंघात आता आ. प्रकाश सोळुंके रमेश आडसकर यांचा घात होत आहे याचा फायदा विद्यमान



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे तुतारीचे उमेदवार मोहन जगताप यांना याचा नक्कीच फायदा होणार आहे अशी मागणी या मतदारसंघात चर्चा जोर धरू लागली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाकडून विद्यमान आमदार प्रकाश साळुंखे यांना उमेदवारी मिळाल्यानंतर हे अजित पवार यांच्या भेटीसाठी घेऊन गेल्यानंतर त्या ठिकाणी अजित दादांनी सांगितले की मी ए/ बी फॉर्म दिलेला आहे तुम्ही घरातलं भांडण आहे घरात बसून मिटवा तर यावेळी अजित दादा पवार यांनी प्रकाश सोळंके यांना संपर्क करून सांगितले की काय करायचे ते ठरवा तर त्यावेळी मात्र आ. प्रकाश सोळुंके यांनी सांगितले की मी दोन ते तीन दिवस मतदार संघात फिरतो व नंतर पसंती दिली तर जयसिंह सोळंके व मला जर मतदारसंघात पसंती दिली तर मी लढत असा अजित दादांना प्रकाश सोळुंखे यांनी सांगितल्याची चर्चा माजलगाव मतदारसंघांमध्ये जोर धरू लागली आहे परंतु जयसिंह सोळुंके प्रकाश सोळुंखे यांच्यातील वादाचा चव्हाट्यावर आला असून अनेक गाड्यांचा ताफा घेऊन बारामतीला अजित पवारांची भेट घेण्यासाठी गेले होते त्यामुळे आ. प्रकाश सोळंके यांचेही घर आता फुटले आहे चुलत्या पुतण्याच्या नात्यांमध्ये दुरावा निर्माण झाला आहे राष्ट्रवादीने रमेश आडसकरांचा गेम केला आहे त्यामुळे आता मोहनराव जगताप याना त्याचा नक्कीच फायदा माजलगाव मतदारसंघांमध्ये होणार आहे अशी चर्चा जनतेमध्ये ऐकायला मिळत आहे. आमदार प्रकाश सोळंके यांचे घर सुद्धा आता बीड जिल्ह्यामध्ये उठायचं बाकी राहिलं होतं तेही काल अजित पवारांचे उमेदवारी जाहीर झाल्यानंतर गेल्यामुळे त्या ठिकाणी हे घर कुठला आहे असेही चर्चा माजलगाव मतदारसंघांमध्ये ऐकायला मिळत आहे.

# रमेश आडसकरांनी प्रचंड शक्तीप्रदर्शनासह भरला अर्ज

## सकाळी ११ ला उठणारे अन् दुपारी ३ ला लोळणारे उमेदवार चालणार आहेत का?



## आडसकरांची नाव न घेता जगताप यांच्यावर टिका

**प्रतिनिधी ।** माजलगांव

गेल्या सात वर्षांपासून अत्यत प्रामाणिकपणे मतदार संघात काम करत आहे. सतत कष्टकरी शेतकऱ्यांच्या साबेत आहे, घरा-दाराची पर्वा न करता मतदार संघात काम केले. या काळात निस्वार्थ आणि प्रामाणिक कार्यकर्ते भेटले, मात्र प्रत्येकवेळी नादी लावण्यात आलं. गेली २३ दिवस आमच्यासोबत नगदी-उधारीचा खेळ खेळण्यात आला, मात्र ऐनवेळी आमचा रूमाल बदलण्यात आला अशी खंत व्यक्त करत सध्याचं राजकारण पैशाभोवती खेळत असल्याचा गंभीर आरोप रमेश आडसकर यांनी केला. सकाळी ११ ला उठणारे आणि दुपारी ३ वाजता लोळणारे उमेदवार आपल्याला चालणार आहेत का? असा प्रश्न उपस्थित करत आडसकरांनी भर सभेतून नाव न घेता मोहन जगताप यांच्यावर टिका केली. जे चिन्ह आपल्याला मिळेल त्याला मतदान करा असे आवाहन करतांनाच मी सरस बाटली तरच मतदान करा हे सांगायलाही ते विसरले नाहीत. बदल हा निसर्गाचा नियम आहे आणि ती वेळ आज आलेली आहे. आता मी स्वतंत्र आहे, कोणत्याही पक्षाचे बंधन माझ्यावर नाही असेही आडसकर यांनी यावेळी सांगितले. दरम्यान उमेदवारी अर्ज भरल्यानंतर झालेल्या रमेश आडसकरांच्या सभेत माजी आ.राधाकृष्ण होके पाटील, माजी

आडसकर म्हणाले २३ दिवस आमच्यासोबत नगदी-उधारी खेळ खेळण्यात आला. राजकारण पैशा भोवती फिरतंय प्रत्येकाला नादी लावलयं, आमचा रूमाल बदलण्यात आला मी सरस वाटलो तरच मतदान करा.आ. आ. मोहनराव सोळंके, माजी मोहनराव सोळंके, माजी जि.प . सदस्य हरिभाऊ सोळके, माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील, विठ्ठल लगड, निळूकाका भोसले, अभय होके,रघुपत शेळके आदि उपस्थित होते.

# शरद पवारांचा रमेश आडसकराना हाबाडा

## पक्षप्रवेश करून घेऊन मोहन जगतांना दिली तुतारी फुंकायला ना. धनंजय मुंडेंच्या विरूध्द राजेसाहेब देशमुख

**प्रतिनिधी ।** बीड

**बीड जिल्ह्यातील राजकीय वातावरण दिवसेंदिवस बदलत असून अचानक काय होईल हे सांगता येत नाही. दोन दिवसांपूर्वी रमेश आडसकरांना उमेदवारी जाहीर होईल असा अंदाज होता. मात्र आज अचानक राष्ट्रवादीने मोहन जगताप यांना मैदानात उतरविले आहे. त्यामुळे प्रकाश सोळंके आणि मोहन जगताप यांच्यामध्ये खरी लढत होणार आहे.**

तर परळी

मतदारसंघात पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख मैदानात उतरले आहेत..जिल्ह्याचेच नव्हे तर महाराष्ट्राचे लक्ष असलेल्या परळी, माजलगाव मतदारसंघात कोण कोणाविरूध्द उभा राहणार?



महाविकास आघाडी व महायुतीकडून शेवटपर्यंत उमेदवार घोषीत केले नव्हते. अखेर आज दोन दिवस उमेदवारी अर्ज दाखल

करून घेऊन हबाडा दिला. आणि दिला आहे तर परळीत मराठा मोहन जगतापांना तुतारी फुंकायला लावली. तर परळी मतदारसंघातून मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून



राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर माजलगाव मतदारसंघातून मोहन जगताप यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पवारांनी या माध्यमातून रमेश आडसकर यांना हाबाडा कार्ड खेळले गेले आहे. परळी मतदारसंघातून शरद पवार कोणाला उतरविणार याची उत्सुकता होती, ती



आता पवारांनी संपविली असून येथून राजेसाहेब देशमुख यांना मैदानात उतरविण्यात आले आहे. माजलगावात प्रकाश सोळंकेंचा सामना आता शरद पवारांचे उमेदवार म्हणून मोहन जगताप करणार आहेत.करण्यास अवधी असल्याने आज माजलगावमधून शरद पवारांनी रमेश आडसकरांचा पक्षप्रवेश

# स्वयंस्फूर्तीने रक्तदानासाठी पुढे यावे - राहुल मोरे

**प्रतिनिधी** । बीड

बीड जिल्हा रुग्णालयात गेल्या काही दिवसापासून रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असून रक्ताची टंचाई आहे.'एका व्यक्तीच्या रक्तदानामुळे तीन लोकांचा जीव वाचू शकतो', म्हणून सध्याची परिस्थिती पाहता स्वयंस्फूर्तीने सुजाण नागरिकांनी रक्तदान करत सामाजिक दायित्व दाखववे,असे आवाहन राहुल मोरे यांनी याप्रसंगी केली आहे.

आपल्या बीड जिल्हा रुग्णालयात सध्या प्रचंड रक्ताचा तुटवडा आहे, एखाद्या रुग्णाला अचानक रक्ताची गरज भासली तर रक्त मिळत नसून एखाद्या विशिष्ट रक्तगटचे रक्त वेळेला मिळत नाही. सध्या रक्ताचा साठा रुग्णालयात नसल्याने अनेक अडचणीला सामोरे जावे लागत असून रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. याचे सर्वानी वेळीच गांभीर्याने घेत 'रक्तदान हे सर्वात श्रेष्ठ दान' समजले जाते, आपले कर्तव्य म्हणून रक्तादान करून आपण दान केलेले रक्त एखाद्या व्यक्तीला अपघातग्रस्तांना, गरजवंतांना, जीवनदान देण्याचे महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, यामुळे सजग नागरिकांनी रक्तदानासाठी पुढे येऊन नियमित रक्तदान करणे आज काळाची गरज बनली आहे.

जिल्हा रुग्णालयात आपत्कालीन अपघात विभाग, शस्त्रक्रिया विभाग त्याचबरोबर जिल्हाभरातून येणारे रुग्णांना दैनंदिन किमान ४० ते ४५ रक्ताच्या बॅगेचा पुरवठा करणे आवश्यक असुन सध्याच्या स्थितीला बीड जिल्हा रुग्णालयात रक्तपुरवठा विभागात कोणताच रक्ताचा पुरवठा शिल्लक नाही त्यामुळे मोठा तुटवडा निर्माण झाला असून रुग्णालयात नियमित शस्त्रक्रिया केल्या जातात या शस्त्रक्रियांना रक्ताची आवश्यकता असते, जर रक्ताचा साठा वाढला नाही तर अशा रुग्णांच्या जीवावर बेतू शकते, याचा सर्वांनीच गांभीर्यपूर्वक विचार करून प्रशासनाला सहकार्य करणे महत्त्वाचे असून आपले कर्तव्य म्हणून कार्य करणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटना, तरुण मंडळी, सेवाभावी संस्था, रक्तदानासाठी कार्य करणाऱ्या सेवा स्वयंसेवी संस्था, सामाजिक क्षेत्रातील कार्य करणाऱ्या सुजाण नागरिकांनी पुढे येऊन रक्तदानाचा पुरवठा वाढवण्यास सहकार्य करणे गरजेचे आहे या परिस्थितीचे वेळीच गांभीर्य




लक्षात घेत जिल्ह्यातील सर्व रक्तपेढ्या साठी साठा वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत ,आपल्यामुळे 'कोणाला तरी मदत होणार आहे', याची जाणीव ठेवत रक्तदान करून प्रशासनास सहकार्य करावे असे ही आवाहन राहुल मोरे यांनी केले आहे.

# जनतेने रक्तदानासाठी पुढे यावे - डॉ अशोक थोरात

**प्रतिनिधी** । बीड

बीड जिल्हा रुग्णालयात गेल्या काही दिवसापासून रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असून रक्ताची टंचाई आहे.'एका व्यक्तीच्या रक्तदानामुळे तीन लोकांचा जीव वाचू शकतो', म्हणून सध्याची परिस्थिती पाहता स्वयंस्फूर्तीने सुजाण नागरिकांनी रक्तदान करत सामाजिक दायित्व दाखववे,असे आवाहन राहुल मोरे यांनी याप्रसंगी केली आहे.

आपल्या बीड जिल्हा रुग्णालयात सध्या प्रचंड रक्ताचा तुटवडा आहे, एखाद्या रुग्णाला अचानक रक्ताची गरज भासली तर रक्त मिळत नसून एखाद्या विशिष्ट रक्तगटचे रक्त वेळेला मिळत नाही. सध्या रक्ताचा साठा रुग्णालयात नसल्याने अनेक अडचणीला सामोरे जावे लागत असून रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. याचे सर्वानी वेळीच गांभीर्याने घेत 'रक्तदान हे सर्वात श्रेष्ठ दान' समजले जाते, आपले कर्तव्य म्हणून रक्तादान करून आपण दान केलेले रक्त एखाद्या व्यक्तीला अपघातग्रस्तांना, गरजवंतांना, जीवनदान देण्याचे महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, यामुळे सजग नागरिकांनी रक्तदानासाठी पुढे येऊन नियमित रक्तदान करणे आज काळाची गरज बनली आहे.



जिल्हा रुग्णालयात आपत्कालीन अपघात विभाग, शस्त्रक्रिया विभाग त्याचबरोबर जिल्हाभरातून येणारे रुग्णांना दैनंदिन किमान ४० ते ४५ रक्ताच्या बॅगेचा पुरवठा करणे आवश्यक असुन सध्याच्या स्थितीला बीड जिल्हा रुग्णालयात रक्तपुरवठा विभागात कोणताच रक्ताचा पुरवठा शिल्लक नाही त्यामुळे मोठा तुटवडा निर्माण झाला असून रुग्णालयात नियमित शस्त्रक्रिया केल्या जातात या शस्त्रक्रियांना रक्ताची आवश्यकता असते, जर रक्ताचा साठा वाढला नाही तर अशा रुग्णांच्या जीवावर बेतू शकते, याचा सर्वांनीच गांभीर्यपूर्वक विचार करून प्रशासनाला सहकार्य करणे महत्त्वाचे असून आपले कर्तव्य म्हणून कार्य करणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटना, तरुण मंडळी, सेवाभावी संस्था, रक्तदानासाठी कार्य करणाऱ्या सेवा स्वयंसेवी संस्था, सामाजिक क्षेत्रातील कार्य करणाऱ्या सुजाण नागरिकांनी पुढे येऊन रक्तदानाचा पुरवठा वाढवण्यास सहकार्य करणे गरजेचे आहे या परिस्थितीचे वेळीच गांभीर्य लक्षात घेत जिल्ह्यातील सर्व रक्तपेढ्या साठी साठा वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत ,आपल्यामुळे 'कोणाला तरी मदत होणार आहे', याची जाणीव ठेवत रक्तदान करून प्रशासनास सहकार्य करावे असे ही आवाहन बीड जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ अशोक थोरात यांनी केले आहे.

# अडवोकेट सुरेश हाते यांनी उमेदवारी अर्ज केला दाखल

**प्रतिनिधी** । तलवाडा

नारायण गडाचे महंत ह भ प शिवाजी महाराजांचा आशीर्वाद घेऊन सुरेश हात्ते यांनी केला उमेदवारी अर्ज दाखल... गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील माजी जि. प. सदस्य माननीय श्री सुरेश हात्ते यांनी सोमवारी नारायणगडांचे महंत ह भ प शिवाजी महाराज यांचा आशीर्वाद घेऊन गेवराई मतदार संघातून अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला आहे यावेळी. मधुकर आदड सिरपत अंतरवाला, रावसाहेब पिंपळे , विठ्ठल चव्हाण



,गोविंद पवार रामपुरी, विकास हात्ते, पत्रकार आर आर आबा, नारायण भांडवलकर, नाथा कावळे, कृष्णा कावळे, शिवाजी काकडे, बाबुराव शिंगणे, सुनील नाटकर, संतोष पिंपळे, दत्ता मस्के, सुरेश शिंदे, नानासाहेब गाडे, संजय पवार, बाळू साबळे, शेकडो कार्यकर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती सोमवारी सकाळी अनेक वडीलधारी मंडळीचा आशीर्वाद घेऊन व तलवाडा येथील त्वरिता मातेचा आशीर्वाद घेऊन माननीय श्री सुरेश हात्ते यांनी उमेदवारी अर्ज भरला मी गेवराईच्या सर्वांगीण विकासासाठी कायम कटिबद्ध राहील यामुळे यंदा गेवराईकर मतदानरुपी आशीर्वाद देतील असा विश्वास सुरेश हात्ते यांनी व्यक्त केला.

# पवारांच्या तुतारीत आधी रमेश आडसकरांचा प्रवेश अन् मोहन जगताप यांना उमेदवारी जाहीर

**प्रतिनिधी** । किल्ले धारूर

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊन दोन आठवडे होत आले तरी मागच्या आठवड्यात माजलगाव मतदार संघातून पवारांची तुतारी कोणाच्या हाती येणार याची चर्चा चांगलीच रंगली होती यात आघाडीवर रमेश आडसकर व मोहन जगताप यांचे नाव होते मात्र मागच्या दोन दिवसापूर्वी रमेश आडसकरांनी त्यांच्या समर्थकांसह मुंबई येथे पवारांचे सिल्वरओक या निवासस्थानी दि.२५ ऑक्टोबर रोजी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.

प्रवेश होतातच रमेश आडसकर यांना उमेदवारी जवळपास निश्चित असल्याचं बोललं जात होतं व आडसकरांचे समर्थक ही तितक्यात ताकतीने जोमाने कामाला लागल्याचे दिसत होते मात्र अचानक काल शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मोहन जगताप यांना माजलगाव मतदारसंघातून उमेदवारी दिली असल्याचे सांगितले अचानक जगतापांना उमेदवारी जाहीर होतातच रमेश आडसकर यांच्यासह आडसकरांच्या समर्थकांना धक्का दिल्याने अखेर आज रमेश आडसकर अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याने इतर इच्छुक उमेदवारांना हाबाडा दिलेला दिसतोय.रमेश आडसकर अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून आडसकरांची पुढची रणनीती काय आसनार हे ही पाहण तितकाच



महत्त्वाचा मानलं जात आहे.आडसकर आपल्या भूमिकेवर ठाम राहिले तर जगतापानां च हाबाडा बसू शकतो का हे ही मतदारांच्या चर्चा रंगल्या जात आहेत.

# लहुजी शक्ती सेनेचा परळी विधानसभेत धनंजय मुंडेंना जाहीर पाठिंबा

**प्रतिनिधी** । परळी

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना लहुजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू भाऊ कसबे यांच्या मान्यतेने लहुजी शक्ती सेनेने परळी विधानसभा निवडणुकीत बिनशर्त पाठिंबा देण्याचे जाहीर केले असून त्याबाबतचे पत्र लहुजी शक्ती सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी धनंजय मुंडे यांना दिले आहे.

मातंग समाजाची महाराष्ट्रातील नामवंत संघटना म्हणून होऊ शकते महायुतीचे अधिकृत उमेदवार धनंजय मुंडे यांना आपण पाठिंबा घोषित करत असून लहुजी शक्ती सेनेचे सर्व पदाधिकारी धनंजय मुंडे यांना विजयश्री खेचून आणण्यासाठी सर्वतोपरी मदत करतील असे या पाठिंबाच्या पत्रात नमूद केले आहे. त्याचबरोबर धनंजय मुंडे यांनी विधानसभा निवडणूक निवडून आल्यानंतर मातंग समाजाच्या विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय प्रश्नांना त्यांच्या माध्यमातून वाचा फोडून हे प्रश्न सोडवावेत अशी अपेक्षाही लहुजी शक्ती सेनेने व्यक्त केली आहे.

दरम्यान लहुजी शक्ती सेनेच्या पाठिंब्याचे आपण मनापासून स्वागत करत असून त्याबद्दल लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू भाऊ कसबे यांसह सर्व पदाधिकाऱ्यांचे आभारी असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले असून मातंग समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मी



कायमच कटिबद्ध आहे असेही धनंजय मुंडे म्हणाले आहेत. यावेळी ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड, लहुजी शक्ती सेनेचे युवक प्रदेशाध्यक्ष भागवत वाघमारे, युवक जिल्हाध्यक्ष निलेश सगट, नरसिंग गायकवाड, दीपक क्षीरसागर, सोमेश क्षीरसागर, किरण सकट, पवन सकट, लखन कुचेकर, कृष्णा साबळे, विनायक मस्के यांसह लहुजी शक्ती सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ पृथ्वीराज पंडित आणि रणवीर पंडितांनी मतदारसंघ ढवळून काढला..!

## विरोधकांच्या अपप्रचाराला बळी न पडता आपल्या हक्काच्या माणसाला आमदार करा - रणवीर पंडित

**प्रतिनिधी** । गेवराई

गेवराई : केवळ निवडणुका लागल्या म्हणून आम्ही तुमच्यापर्यंत आलोत अशी बाब नाही तर शिवछत्र परिवार कायम तुमच्या सोबतच असतो. जनसेवा करण्याचा मूलमंत्र आदरणीय शिवाजीराव दादा पंडित यांनी आम्हाला दिलेला आहे. गोरगरीब लोकांच्या सुखदुःखाला साथ देणे, त्यांच्या अडीअडचणी सोडवणे हाच आमचा प्रथम हेतू आहे. आजच्या या घडीला तुमच्या कामाला माणूस कोण आहे? हे ओळखा आणि आपल्या कामाचा माणूस आणि आपल्या हक्काचा माणूस असणारे विजयसिंह पंडित या तरुण तडफदार नेतृत्वाला काम करण्यासाठी संधी द्या, विरोधकांच्या अपप्रचाराला बळी न पडता आपल्या हक्काच्या माणसाला प्रचंड मताधिक्याने विजय करून विधानसभेत पाठवा असे आवाहन युवा नेते पृथ्वीराज पंडित आणि रणवीर पंडित यांनी केले. गेवराई विधानसभा मतदारसंघात मतदारांच्या गाठीभेटीत त्यांच्याशी संवाद साधताना ते बोलत होते. गेवराई विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व महायुतीचे अधिकृत उमेदवार विजयसिंह



पंडित यांच्या प्रचारार्थ त्यांचे पुतणे पृथ्वीराज पंडित आणि रणवीर पंडित यांनी मतदारसंघ ढवळून काढला आहे. नव मतदारांसोबत जेष्ठ नागरिकांनी संवाद साधताना त्यांनी विजयसिंह पंडित यांना आमदार म्हणून विजयी करण्याचे आवाहन केले. रविवार, दि.२७ ऑक्टोबर रोजी हिंगणगाव, श्रीपतआंतरवाला, गोपतपिंपगाव, गोंदी, ढालेगाव, संगमजळगाव, रामपुरी, कोल्हेर, बाबुलाल आदी गावांना भेटी देवून मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी बोलताना पृथ्वीराज पंडित म्हणाले की, सर्वसामान्य जनतेची सेवा करणे त्यांचे मूलभूत प्रश्न सोडविणे ही शिकवण आम्हाला आदरणीय दादांनी दिली आहे. विकास हाच आमचा ध्यास असून यासाठी सर्वांनी एकत्र येऊन महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना विजयी करण्याची आवाहन त्यांनी यावेळी केले. मतदारांशी संवाद सत्तांना रणवीर पंडित म्हणाले की, माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये सिंचनावर मोठे काम केले आहे. आपला तालुका पाणीदार व्हावा अशी त्यांची प्रमाणिक भावना आहे. जि.प. अध्यक्ष म्हणून विजयसिंह पंडित यांनी संपूर्ण जिल्हाभर दखल घेता येईल असे काम केलेले आहे. आपल्या विकासाभिमुख कामाची झलक त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळात पाहायला मिळाली. अशा नेतृत्वाला मतदारसंघांची सेवा करण्याची संधी मिळवून देण्याची जबाबदारी आपली आहे.

# बीड जिल्हा संघाचा २२ यार्ड पुणे संघावर विजय

## शौर्य शैलेश जाधव, कृष्णा गायकवाड, कुणाल वाघ, यांची चमकदार कामगिरी

**प्रतिनिधी** । छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र क्रिकेट आयोजित एमसीए अंडर १४ निमंत्रित लीग क्रिकेट स्पर्धेत बीड जिल्हा संघाच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी नोंदवली आहे बीड जिल्हा संघानी २२ याड्र्स पुणे या संघ विरुद्ध खेळताना बीड जिल्हा संघाने दोन दिवसीय सामन्यात प्रथम गोलंदाजी करताना २२ याड्र्स पुणे संघाला १११ धावांत सर्व बाद केले यावेळी बीड जिल्ह्याकडून गोलंदाजीत कुणाल वाघ व कृष्णा गायकवाड यांनी प्रत्येकी पाच- पाच गडी बाद केले.

बीड जिल्ह्याकडून फलंदाजी करताना शौर्य शैलेश जाधव येणे उत्कृष्ट अशी फलंदाजी करत सर्वाधिक १५३ धावा काढल्या यावेळी त्याने २५ चौकार मारले व त्याला कृष्णा गायकवाड ने चांगली साथ देत ६१ धावा काढल्या दोघांनी सातव्या विकेटसाठी १२२ धावांची भागीदारी केली बीडचा संघ २४५ वर सर्व बाद झाला यात शौर्य जाधव १५३ धावा व कृष्णा गायकवाडच्या ६१ धावा या महत्त्वाच्या ठरल्या हा सामना उशिरा सुरू झाल्याने अनिर्णित राहिला व बीड जिल्ह्याने पहिले इनिंगने हा सामना जिंकला.

याबद्दल बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव अमेर सलीम, राजन साळवी, इरफान सर, गोपाल गुरखुदे, आरेफ शेख, आतिक कुरेशी यांनी शौर्याच्या फलंदाजीचे व बीड संघातील खेळाडूंचे विशेष कौतुक केले




शौर्याला ज्येष्ठ प्रशिक्षक अजहर शेख, संजय धस, व पुण्याचे प्रशिक्षक सागर सांगळे, व आदर्श क्लबचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे. बीड जिल्हा संघा सोबत गेलेले युवा प्रशिक्षक अक्षय नरवाडे यांचे देखील कौतुक होत आहे. या फलंदाजी बद्दल सर्व खेळाडूंनी व पालक वर्ग तसेच बीड जिल्हा वकील संघाने शौर्य जाधव चे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.

# मराठा मुस्लिम समीकरण जुळवून शेख निजाम बीड विधानसभेचा तगडा उमेदवार?

**प्रतिनिधी** । बीड

विधानसभेमध्ये प्रत्येक राजकीय पक्षाने प्रस्थापित उमेदवारांना नेहमी साथ देऊन आमदार खासदार मंत्री केले परंतु बीड विधानसभा चा हवा तसा विकास साधता त्यांना आलेला नाही मागील झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मराठा योद्धा जरांगे फॅक्टर चांगलाच गाजला होता त्याचीच परिणीती म्हणून बजरंग सोनवणे हे बीड लोकसभेचे खासदार म्हणून निवडून गेले होते यंदा होत असलेल्या बीड विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये प्रत्येक राजकीय पक्षाने सर्वसामान्य लोक भावना लक्षात न घेता प्रस्थापित कुटुंबातील उमेदवारांनाच उमेदवारी दिलेले आहेत परंतु मनोज जरांगे पाटील यांच्याकडे उमेदवारीसाठी आग्रही असलेल्या १६ उमेदवारांना मनोज जरांगे पाटील यांनी आपसात चर्चा करून एकच उमेदवार ठरवावा अशी सूचना केल्यामुळे १६ उमेदवारापैकी एकच मुस्लिम उमेदवार शेख निजाम असल्यामुळे मराठा मुस्लीम समीकरण जुळवून विजयाची खात्री शेख निजाम



यांच्या रूपाने घडत असल्याचे दिसते शेख निजाम हे मोठा राजकीय सामाजिक शैक्षणिक दृष्ट्या प्रबळ असणारे व्यक्तिमत्व असून गेल्या ३० वर्षापासून प्रस्थापित क्षीरसागर कुटुंबीय यांच्या विरोधात अखंडपणे लढणारा व्यक्ती म्हणून त्यांची ओळख आहे मागील झालेल्या बीड नगर परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत अत्यंत अल्पशा मतांनी त्यांचा पराभव झाला होता परंतु सर्वसामान्य लोकांमध्ये त्या झालेल्या पराभवाची सल आजही कायम आहे त्यामुळे मराठा योद्धा मनोज जारंगे पाटील यांची जर साथ मिळाली तर मराठा मुस्लिम समीकरण जुळवून शेख निजाम हे नक्कीच विजयी होतील असा सर्वसामान्य लोकांमध्ये विश्वास आहे व शेख निजामहे बीड विधानसभेचे तगडे उमेदवार ठरू शकतात अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे

# परीट समाजाचे अनुसुचित जात आरक्षणाचे भिजत घोंगडे कधी सुटणार?

## राष्ट्रसंत गाडगेबाबा आर्थिक विकास महामंडळ समाजाला कधीमिळणार...?

प्रतिनिधी । बीड

**परीट/धोबी समाजाचा नेहमी प्रत्येक निवडणुकीत केवळ मतांसाठीच वापर होतो का ?असा सवाल भाजपचे कार्यकर्ते असलेले परीट/धोबी समाज तथा डेबुजी युथ ब्रिगेड महाराष्ट्र प्रदेश संयोजक श्री.दादासाहेब नन्नवरे यांनी उपस्थित केला आहे.**

**त्यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रात जवळ जवळ ४५ ते ५० लाखांच्या आसपास परीट/धोबी समाजाची लोकसंख्या आहे.समाजाचे बरेच नेते विविध राजकीय पक्षांमध्ये आहेत. काही जण प्रमुख पदाधिकारी आहेत.खासदार,नगरसेवक,अशी जबाबदारी सुध्दा समाजाचे कार्यकर्ते पार पाडत आहेत.**

तरीही पक्षनेतृत्व त्यांचा विचार करत नाही ही फार मोठी शोकांतिका आहे.महाराष्ट्रात ठिकठिकाणी मोठमोठे मेळावे आयोजित केले



जातात व राजकीय नेते येऊन फक्त बोलबच्चन आश्वासने देतात.पण परीट समाजाला कोणताही राजकीय पक्ष ताकद देऊ शकत नाही का,असा सवाल डेबुजी युथ ब्रिगेड महाराष्ट्र प्रदेश संयोजक यांच्यासह प्रदेश सचिव मोहन राऊत,शंकर व्यवहारे,गणेश नन्नवरे,महादेव नन्नवरे,राम काळे,श्रीकांत जाधव,विकास व्यवहारे,विलास जाधव,सतिष मुळे,बाबू भालेकर,राजेंद्र मोताळे,संजय वाघमारे,सोमनाथ नन्नवरे,दत्ता नन्नवरे,शहादेव नन्नवरे,ज्ञानेश्वर राऊत,परमेश्वर राऊत,प्रदिप वाघमारे,नवनाथ राऊत,आदींनी उपस्थित केला आहे.

# प्रा. विकास ढोकणे यांना राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी । बीड

ऑल इंडिया ह्युमन राईट्स असोसियशन नवी दिल्ली तर्फे दिला जाणारा डॉ .ए .पी. जे. अब्दुल कलाम राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार प्रा.विकास बळीराम ढोकणे यांना प्रदान करण्यात आला . प्रा. विकास ढोकणे हे शासकीय तंत्रनिकेतन बीड यथे अधिव्याख्याता इंग्रजी या पदावर कार्यरत आहेत. फुले -शाह- आंबेडकर-शिवराय यांचे विचार अनुसरून प्रा. विकास ढोकणे हे परिवर्तनाच्या चळवळीत तसेच पर्यावरणाच्या चळवळीत कार्यरत आहेत. कविता,कथा आणि वैचारिक लेखन ते सातत्याने करत आले असून महाराष्ट्रातील विविध साहित्य संमेलनामधून ते परिवर्तनाच्या कविता सादर करत आहेत.आगामी काळात प्रा. विकास ढोकणे यांचा कविता संग्रह व कथा संग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. पुरस्कार मिळाल्याबद्धल




त्यांचे सामाजिक-शैक्षणिक स्तरातून अभिनंदन होत आहे. प्रा. प्रदीप रोडे ,प्रा. डॉ . मनोहर सिरसाट , प्रा. डॉ .सुनील वाघमारे, अशोक भाऊ तांगडे ,तत्त्वशील कांबळे प्रा.डॉ .राजश्री तावरे ,प्रा .डॉ . अंजली वाघमारे, अविनाश हिवरेकर, निसर्गमित्र अभिमान खरसाडे,मराठवाडा शिक्षक संघटनेचे सचिव राजकुमार कदम ,चरणराज ढोकणे आदींनी त्यांचे अभिनंदन केले

# धारूर पोलीसांचे पथसंचलन

## निवडणुक काळात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्याचे आवाहन

प्रतिनिधी । धारूर

विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने धारुर पोलिसांच्या वतीने धारूर शहर व आडस येथे पोलीस पथसंचन करण्यात आले. यावेळी निवडणूक काळात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्याचे आवाहन सहाय्यक पोलिस निरिक्षक देविदास वाघमोडे यांनी केले. पोलीस स्टेशन धारूर हद्दीत धारूर शहरात तसेच दूरक्षेत्र आडस येथे दिनांक २७ आक्टोंबर रविवार रोजी विधानसभा निवडणूक २०२४ अनुषंगाने बीडचे पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलिस अधिक्षक चेतना तिडके व केज उपविभागीय पोलिस अधिकारी कमलेश मिना यांच्या मार्गदर्शनाखाली दोन रूट मार्च घेण्यात आले. सदर रूट मार्च दरम्यान पो.स्टे चे ३ अधिकारी व २१ अंमलदार हजर होते तसेच बी.एस.एफ. चे २ अधिकारी व ४६ जवान हजर व २ आर सी पी



पथकाचे २४ अंमलदार हजर होते. धारूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यान्ी या पथसंचलन सुरळीत व शातृतेत होण्या साठी व्यवस्थीत नियोजन केले.

# डॉ.योगेश क्षीरसागरांचा उमेदवारी अर्ज दाखल

## बीडमध्ये आयोजित बैठकीला मेळाव्याचे स्वरूप

प्रतिनिधी । बीड

युवा नेते डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी शहरातील संपर्क कार्यालयात आज १ वाजता तातडीची बैठक बोलावली आहे. त्यांच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्यांनी आज मुहूर्त चांगला असल्याने उमेदवारी अर्ज दाखल करत आहे. महायुतीचा बीडच्या जागेचा निर्णय झालेला नसून अजूनही अपेक्षा आहेत. परंतु, आपण भरलेला उमेदवारी अर्ज काढण्यासाठी नसेल, अशा शब्दात डॉ.योगेश क्षीरसागर यांनी निवडणूक लढविणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

महायुतीकडून बीडच्या जागेचा तिढा अध्यक्ष सुटलेला नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून इच्छुक असलेले डॉ.योगेश



क्षीरसागर यांनी बैठक बोलावून उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्णय जाहीर केला. तातडीने बोलावलेल्या बैठकीला मेळाव्याचे स्वरूप आले होते. योगेशभैय्या आता निर्णय घ्या, माघार घेऊच नका, अशा शब्दात पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भावना व्यक्त केल्या. डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, बीडवासियांनी अनेकांना संधी दिल्या. क्षीरसागर कुटुंबातील माझ्या वडीलासंह अनेकांना संधी मिळाली. एकदा मला संधी देऊन बघा. मला विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवायची आहे, जातीपातीच्या राजकारणात मला पडायचे नाही. मी २४ तास जनतेच्या दरबारात आहे. मोठ्या अपेक्षेने कामे घेऊन सर्वसामान्य लोक आपल्याकडे येतात. लोकांची सेवा करतानाच पक्षाचा प्रत्येक आदेश पाळून पक्ष संघटन केले. प्रत्येक बूथ, गल्ली, वॉर्डात पक्ष पोहचविला. प्रत्येक बूथवर फक्त आपली यंत्रणा सक्षम आहे. जनतेच्या आशीर्वादाने निवडणुकीला सामोरे जाऊ, आपली ताकद दाखविण्याची वेळ आली आहे, असे डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले.

शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज भरणार

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या बैठकीस आलेल्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी तत्काळ अर्ज भरा असा आग्रह धरला. त्यानंतर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सा ै.के .एस.के . महाविद्यालयापासून पायी चालत जाऊन तहसील कार्यालयात अर्ज दाखल केला. यावेळी तहसील कार्यालय परिसरात मोठी गर्दी झाली होती.

# नितीन जायभाये बीड विधानसभेच्या रिंगणात...

# एकच पर्व... ओबीसी सर्व..

## सकलं ओबीसी,एस सी./ एस टी; मुस्लिम व सकलं बहुजन समाजाच्या न्याय, हक्कांसाठी

प्रतिनिधी । बीड

गेल्या ३० वर्षांपासून सतत संघर्ष व चळवळींची पार्श्वभूमी असलेले, बीड शहरातील नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात लोक-नागरिकांच्या अडीअडचणी समस्या सोडविण्यात नेहमीच अग्रेसर पणे काम करणारे, संघटनात्मक बांधणीचा प्रचंड गाढा अनुभव असलेले, सकल ओबीसी, एस सी./ एस टी; मुस्लिम व सर्वच बहुजन समाजांच्या तळागाळातल्या शेवटच्या घटकाच्या ही अडीअडचणी समस्यांची जाण आणि भान असलेले , फक्त बीड शहरच नव्हे तर समस्त बीड जिल्हा व बीड जिल्ह्याच्या बाहेर ही प्रचंड फार मोठा मित्रपरिवार असलेले, सर्वच लहान थोर आणि सर्व मित्र परिवाराच्या मनावर सुवृत्तीभावाने,प्रेमाने व तळमळीने अधिराज्य करणारे, सर्व जाती धर्मांच्या लोकांना हृदयापासून जपणारे, कुठल्याही भेदभावाच्या विषाचा स्पर्शही न झालेले व सर्वांना सोबत घेऊन चालणारे, कळवळा असलेले, सर्व मित्र परिवाराला हृदयापासून जपणारे व लोकप्रिय अग्रणी समाजसेवक, सर्वांचे हृदयस्पर्शी, असे बहुआयामी व्यक्तिमत्व श्री नितीनजी जायभाये हे बीड विधानसभेच्या रिंगणात उतरले आहेत. आदरणीय कै. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या काळातही भगवान सेनेच्या संघटनात्मक बांधणीमध्ये फार मोलाचा व सिंहाचा वाटा उचललेले,अनेक निवडणुकांचा सक्रिय अनुभव असलेले असे नितीनभाऊ सर्वांनाच पूर्वीपासूनच सुपरिचित आहेत. अनेक निवडणुका लढवून, ग्राउंड वर काम करून त्या जिंकण्याचा प्रदीर्घ अनुभव त्यांच्या पाठीशी



आहे.नितीनभाऊ' हे लोकाभिमुख व कार्यतत्पर व्यक्तिमत्व आहे. सतत लोकसंपर्कात राहणे, लोकांच्या कामांसाठी, समस्या सोडवण्यासाठी पाठपुरावा करत राहणे,तळागाळातील शेवटच्या घटकांची व सर्व स्तरातील लोकांची मदत करत राहणे,लोकांचे गाऱ्हाणे व म्हणणे ऐकून घेणे , त्यांना योग्य तो प्रतिसाद देणे त्यांच्या असलेल्या अडचणी योग्य त्या मार्गाने दुर करणे,अशा संयमशील धोरणाचा अवलंब काम करताना करत असतात.

बीड शहराच्या विकासाचा गेल्या ४० वर्षात शिल्लक राहिलेला अनुशेष, बीड शहराची झालेली दुरावस्था, प्रस्थापितांचा गलथान कारभार,नगरपालिकेची मरगळलेली व भ्रष्ट कार्यशैली, नागरिकांच्या मूलभूत सोयी, सुविधा या सर्वच बाबतीत अग्रणीपणे व प्रभावीपणे नितीनभाऊ काम करत आहेत.त्यांचा दृष्टिकोन दूरगामी व विकासाभिमुख आहे.तसेच बीड शहराला पुढे घेऊन जाणारा व सुंदर शहर साकारणारा आहे. त्यांनी बीड शहरातील नागरिकांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी व त्या तात्काळ सोडविण्यासाठी,शहरातील सुज्ञ व जागरूक नागरीकांना सोबत घेऊनबीड शहर बचाव मंच नावाने मंचाची स्थापना केली आहे.ग्रामीण भागातील विकासाचा अनुशेष, मागासलेला जीवनस्तर,शेतकऱ्यांच्या न संपणाऱ्या समस्या या सर्व बाबीं विषयी नितीनभाऊ यांचा दृष्टिकोन विकासाभिमुख, दूरगामी व आधुनिक पद्धतींचा स्वीकार करणारा आहे.श्री नितीनजी जायभाये यांच्या रूपाने सर्व समावेशक लोकाभिमुख पर्याय बीड विधानसभा मतदारसंघाला मिळाला आहे.बीड विधानसभा मतदार संघातील जनता प्रचंड मताधिक्याने विजयी करणार असा त्यांनी आत्मविश्वास ही व्यक्त केला आहे. बीड विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी, प्रस्थापित नेत्या पुढार्यांनी केलेली दुर्गती संपवण्यासाठी येत्या २० तारखेला होणाऱ्या मतदान प्रक्रियेमध्ये मतदान करून प्रचंड मताधिक्याने विजय करा असे विनम्र आवाहन नितीनभाऊ जायभाये यांनी सर्व मतदार बंधू-भगिनींना व बीड विधानसभा मतदार संघातील तमाम मायबाप जनतेला केले आहे.

# शरदचंद्र पवार साहेबांच्या विचारांचा आमदार करण्यासाठी युवकांची फौज उभी करणार - ऋषिकेश गडदे

प्रतिनिधी । किल्ले धारूर

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजलगाव मतदारसंघातील विवीध पक्षाचे नेते गावभेटी दौरा करत तयारीला लागलेले पाहायला मिळत असताना गावोगावी जाऊन मतदारांसोबत बैठका घेऊन संवाद साधत आहेत. माजलगाव मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व आदरणीय पवार साहेब जो उमेदवार देतील त्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी माजलगाव मतदारसंघातल्या राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार सर्व पदाधिकार्यानी एकत्र येऊन कामाला लागा आणि विधानसभेतील आमदार म्हणून पवार साहेबनांच्या शिलेदाराला निवडून आणायचे आहे जोमाने कार्यकर्ते तयारीला लागले आहेत जीवाचं रान रात्रीचा दिवस करून तरुणांना एकत्र करत मोठी ताकद उभी करून यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा आमदार करू असा निर्धार राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कार्यकारिणी सदस्य ऋषिकेश गडदे पाटील यांनी केला आहे.



गडदे पाटील यांनी मतदारांच्या भेटीगाठी घेत आहेत. माजलगाव मतदार संघात सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी लढणारे कार्यकर्त्यांच्या जीवाला जीव देणारे सगळ्यांना सोबत घेऊन चालणारे सदैव सर्वसामान्यांच्या सुखदुःखात सावलीप्रमाणे सोबत असणारा आसा चेहरा पवार साहेब देतील आसा विश्वास देत सर्व मतदारसंघात युवकांच संघटन बळकट करण्यासाठी प्रयत्न करणार

# वृक्षतोडी प्रमाणेच वनविभागाचे आचारसंहितेकडे दुर्लक्ष

## मोरदरा येथील वनपर्यटन कामांचा भुमिपुजन फलक उघडाच तक्रारी नंतर वनविभागाला जाग आली आणि फलक झाकला :- डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी । बीड

निष्पक्ष निवडणुका घेण्यासाठी निवडणूक आयोगाने काही नियम बनवले आहेत.निवडणुक आयोगाच्या या नियमांना आचारसंहिता म्हणतात. निवडणुकी दरम्यान या नियमांचे पालन करणे ही सरकार, नेते आणि राजकीय पक्षांची जबाबदारी असते. आयोगाने निवडणुक कार्यक्रम जाहीर करताच आचारसंहिता लागू होते.निवडणुक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आचारसंहितेच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक असते.

याच कालावधीत सरकारी घोषणा, पायाभरणी किंवा उद्धाटन समारंभ होत नाहीत.तसेच राजकीय नेते यांनी केलेल्या शासकीय कामांच्या भुमिपुजन अथवा उद्धाटन यांचे दर्शनी भागात असणारे फलक कपड्यांनी अथवा ईतर कोणत्याही आवरणाने झाकुन टाकणे बंधनकारक असते.मात्र वनविभागातील अधिकारी यांना याचे गांभीर्य नसुन बीड तालुक्यातील कोळवाडी येथील सुप्रसिध्द महादेवाचे पुरातन मंदिर आणि संत गंगाभारती महाराज यांची समाधी असणारे तपोवन आणि मोरांच्या वास्तव्यामुळे मोरदरा नाव पडलेल्या पर्यटन स्थळी अगदी दर्शनी भागात वनविभाग बीड यांच्या मार्फत विविध वनपर्यटन विकासकामांचे भुमिपुजन सोहळा फलक उघडाच असुन त्यावर ना.पंकजाताई मुंढे ( मंत्री ग्रामविकास , महिला व बालविकास , महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड, कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेशभाऊ



पोकळे , सदस्य जिल्हा नियोजन समिती बीड या लोकप्रतिनिधींची नावे ठळक दिसत आहेत. या ठिकाणी रविवारी पर्यटन स्थळ आणि सोमवारी महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी असते.आज दि.२७ रविवार रोजी बीड येथील गुरूकुल शाळेच्या मुलांची सहल आली होती. मंदिराच्या पायथ्याशी पाय-या चढतानाच दर्शनी भागात फलक असल्याने सर्वांचेच लक्ष याकडे जात असुन बीड जिल्ह्यातील वृक्षतोडीकडे दुर्लक्ष करणाऱ्या वनविभागाने आदर्श आचारसंहितेकडे सुद्धा दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होत असुन संबंधित प्रकरणात जबाबदार वन आधिका-यांवर निवडणूक आयोगाने कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

१५ ऑक्टोबर रोजी विधानसभा निवडणूक अनुषंगाने आचारसंहिता लागलेली असून काल दि. २७ रविवार रोजी पर्यंत फलक झाकलेला नव्हता.काल डॉ .गणेश ढवळे यांनी जिल्हाधिकारी यांना आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार केल्यानंतर अखेर दुसऱ्या दिवशी आज वनविभागातील आधिका-यांना जाग आली असुन पहाटे फलक कपड्यांने झाकुन त्याचे फोटो मला पाठवले आहेत. तक्रारीनंतर आणि विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर वनविभागातील आधिका-यांना जाग येण्याऐवजी त्यांनी अगोदरच दक्ष राहायला हवे.अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली.

# जयदत्त अण्णांच्या समर्थकांची रॅली बघून विरोधकांचे धाबे दणाणले

## आपण स्वयंपूर्ण आहोत सर्वांनी साथ दिली तर हा डाव देखील जिंकता येईल-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**प्रतिनिधी । बीड**

बढता बढता कारवा बन गया अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, स्वर्गीय काकु नाना हे आपल्यासाठी शक्तीपीठ आहे आपण एवढा मोठा उत्स्फूर्त आणि उदंड प्रतिसाद दिला हे माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहे आता आपण स्वयंपूर्ण आहोत सर्वांनी साथ दिली तरच पुढचा डाव जिंकता येईल असे भावनिक आवाहन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे

आज माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे आगमन होणार असल्याची माहिती मिळतात तरुण कार्यकर्त्यांनी पाडळसिंगी टोल नाक्यापासून ते बीड शहरापर्यंत भव्य मोटरसायकल रॅली काढून भव्य स्वागत केले २००० गाड्यांचा ताफा जेव्हा शहरातून जात होता तेव्हा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर देखील भारावून गेले होते रस्त्यात ठीक ठिकाणी लोकांचा समुदाय त्यांच्या स्वागतासाठी उभा होता अनेक कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी तोफांची सलामी देत आपल्या लाडक्या नेत्याचे स्वागत केले स्वर्गीय काकू नाना यांच्या समाधीला अभिवादन केल्यानंतर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उपस्थित कार्यकर्त्यांची मनमोकळेपणाने संवाद साधला ते म्हणाले स्वर्गीय काकू नाना हे आपल्यासाठी शक्तीपीठ आहे आपला एवढा मोठा उत्स्फूर्त आणि उदंड प्रतिसाद मला प्रेरणा देणार आहे सगळ्याला फाटा देऊन स्वयंपूर्ण होत पुढे जातोय नातेगोते तुटतात काळाच्या ओघात दुरावा निर्माण होऊ लागला आहे सामाजिक वेन विस्कटू लागली आहे आपण आज मला मोठा प्रतिसाद दिला उतणार नाही मातणार नाही घेतला वासा टाकणार नाही हे मी आज सर्वांसमोर जाहीर करतो अनेक चढउतार अनेक वळणे बघितली अनेकांनी मला आग्रह केला आपण सहा महिन्यापासून आपल्या तयारीला लागलो आहोत वाट लावणारे पुढे येत आहेत पण वाट दाखवणारा असावा लागतो याची जाण आणि भान या मतदारसंघातील लोकांना आहे सगळा बाजार भरलाय डिजिटल सारेच दिसू लागले आहेत परंतु वस्तुस्थिती काय असा प्रश्न निर्माण होतो कोण कुणीकडे जातोय याचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे करता करविता परमेश्वर आहे नियती सर्वांचा हिशोब करत असते लोकशाहीत असेच आहे लोक संधी देऊन बघतात आपण आपला वसा आणि वारसा नुसार चालावं लागतं पण आज कुणाचा आदर्श घ्यावा असा कोणी आहे का असा प्रश्न आहे समरसतेचे वातावरण निर्माण झाले आहे लोकशाहीत कुठलातरी निर्णय घ्यावा लागतो आता आपण स्वयंपूर्ण आहोत सर्वांनी साथ दिली तर पुढचा डाव जिंकता येईल जात-पात बाजूला ठेवून आपण सर्वजण पुढे जाऊया आपला आरसा स्पष्ट आहे वास्तव आणि वस्तुस्थिती सर्वांसमोर आहे आपण आपला अधिकार यासाठी वापरण्याची वेळ आली आहे २० तारखेला आपली ताकद दाखवावी लागेल मी सेवेचे व्रत घेतले आहे माझ्याकडून सेवा करून घेणे हे आपले काम आहे तुम्ही पोटतिडकीने बोलता तसे काम करा आपण वाट बघितली थांबलो देखील पण आपलं मूळ आपल्याला विसरता येणार नाही आपला विश्वासाचा धागा आहे तो कधीही तुटू देणार नाही माझ्या जागी आपणच आहात असे समजून तुम्ही चमत्कार करा उद्या दिनांक २९ तारखेला अर्ज भरणार आहोत हे निवडणूक भाग्यरेषा बनवणारी आहे आपल्याला जे साध्य करायचे यासाठी समर्थ साथ द्या लोकशक्ती हीच माझी शिदोरी आहे आता दिवाळी आहे फटाके तर वाजत असतात






परंतु आपले फटाके हे विजयाचे फटाके वाजले पाहिजेत असा दृढ निश्चय करा असे आवाहन करून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उपस्थित जनसमुदायास भावनिक आवाहन केले यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे सर्व प्रमुख समर्थक कार्यकर्ते महिला तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सत्तेत असो किंवा नसो माझ्या मातीतील माणसांची सेवा करण्याची शक्ती प्रभू वैद्यनाथ आणि मला द्यावी - धनंजय मुंडे

## मुंबईतील चेंबूर व ठाण्यातील घोडबंदर येथील परळीकरांशी धनंजय मुंडेंनी साधला संवाद
## सेवा हीच माझी जात आणि विकास हाच माझा धर्म - धनंजय मुंडे यांची साद

**प्रतिनिधी । मुंबई**

मी आज इथपर्यंतचा प्रवास केला तो माझ्या परळीतील जनतेच्या आशीर्वादाच्या बळावर केला. परळी जनता आणि मी यांच्यात जिव्हाळा आणि विश्वासाचे नाते आहे. परळीचा माणूस पुण्या मुंबईतच काय देशाच्या पाठीवर कुठेही राहत असला तरी त्याच्या प्रत्येक अडीअडचणीला धावून जाणे हे माझे कर्तव्य आहे. आपण सत्तेत असोत किंवा नसोत, मात्र आपल्या मातीतील माणसाची सेवा करण्याचे बळ मात्र मला प्रभू वैद्यनाथाने द्यावे, अशी मी कायम प्रार्थना करत असतो, असे वक्तव्य धनंजय मुंडे यांनी आज मुंबईत बोलताना केले आहे.

मुंबईतील चेंबूर व ठाण्यातील घोडबंदर येथे आज धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई, ठाणे व परिसरात वास्तव्यास असणाऱ्या परळीकर नागरिकांशी कौटुंबिक संवाद साधला. यावेळी दोन्ही ठिकाणी परळीसह बीड जिल्ह्यातील नागरिकांची उपस्थिती लक्षणीय होती. पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले की, परळीच्या मातीतील माणूस मोठा व्हावा, नागरी सुविधा उपलब्ध व्हाव्यात, स्थानिकांना स्थानिक पातळीवरच रोजगार उपलब्ध व्हावेत, यासाठी मी कायम प्रामाणिक प्रयत्न करत आलोय. आणि हे प्रयत्न मी परळीच्या विकासाचे व इथल्या



माणसाच्या आर्थिक उन्नतीचे जे स्वप्न बघितले आहे, ते पूर्ण होईपर्यंत थांबवणार नाही, असेही ते पुढे बोलताना म्हणाले.

दरम्यान आज अनेक मोठे नेते मला घेरून माझे अस्तित्व संपवण्याची भाषा करत आहेत. माझी जात, माझे कुटुंब हलके व छोटे आहे, असे बोलण्याची वेळ मोठमोठ्या नेत्यांवर येते, याचा अर्थ आपणही काही प्रमाणात का असेना पण राज्याच्या नजरेत आहोत. मात्र मला जाती-पातींचे राजकारण कधी करता आले नाही. सेवा हीच जात आणि विकास हाच धर्म म्हणून काम करणारे आम्ही लोक आहोत आणि या ब्रिदाला कधीही चुकणार नाहीत, असेही धनंजय मुंडे म्हणाले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी व नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



# अक्षय गवळी यांना रतन टाटा युवारत्न परिवर्तन पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी । बीड**

मुंबई यशवंतराव चव्हाण सेंटर येथे रविवार दिनांक २७ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी एक वाजता इको फ्रेंडली लाइफ आणि तरुण तगडा भारत आयोजित रतन टाटा युवारत्न परिवर्तन पुरस्कार २०२४ हा देण्यात आला. मानवी अभियानचे युवा नेते व सामाजिक कार्यकर्ते तथा पिंपळगाव (ना) ग्रामपंचायत सदस्य अक्षय गवळी यांना इको फ्रेंडली लाईफ आणि तरुण तगडा भारत संस्थेच्या संस्थापक श्री.अशोक एन जे याच्या हस्ते देण्यात आला. हा पुरस्कार सामाजिक, राजकीय, क्षेत्रामध्ये उत्तीर्ण काम करणाऱ्या व्यक्तींना दिला जातो. मानवी अभियानचे युवा नेते व सामाजिक कार्यकर्ते तथा पिंपळगाव (ना) ग्रामपंचायत सदस्य अक्षय गवळी यांचे काम दलित, वंचित, असंघटित क्षेत्रातील लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी व लहान मुलाच्या हक्क आदिवासी या सर्व घटकांमध्ये यांचं मोठं काम आहे याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे सर्व स्तरावरून

# २६ वर्षीय तरुणाची गळफास घेवून आत्महत्या

**प्रतिनिधी । गेवराई**

## गेवराई तालुक्यातील पाचेगाव जवळील पवारवाडी तांडा येथील घटना स्मशानभूमीत अंत्यसंस्कारला विरोध ; नातेवाईकांकडून तब्बल चार तास ठिय्या

गेवराई : शेतमजूर कुटुंबातील तरुण युवकाने चिंचेच्या झाडाला शर्टच्या साह्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना शनिवार दुपारी २ वाजता पवारवाडी तांडा (ता.गेवराई) येथे उघडकीस आली. कर्जबाजारी पणाला कंटाळून गळफास लावून आत्महत्या केल्याची माहिती मयताच्या नातेवाइकांकडून समजते आहे. दरम्यान सदरील तरुणावर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी काही लोकांनी विरोध केल्याने नातेवाईकांकडून तब्बल चार तास ठिय्या मांडला होता शेवटी पोलीसांच्या मध्यस्थीने स्मशानभूमी शेजारील जागेवर सदरील मयतावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की,गेवराई तालुक्यातील पाचेगाव नजिकच्या पवारवाडी तांडा येथील अत्यंत गरीब कुटुंबातील शेतमजूर तरुण बळीराम व्यंकट राठोड वय २६ वर्ष, (भूमिहीन) याने कर्जबाजारी पणाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. दरम्यान यावेळी त्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी स्वतःच्या मालकीची जमीन नसल्याने पवारवाडी तांड्यातील अर्धवट बांधलेल्या स्मशानभूमीत नेले असता अंत्यसंस्कारला काही लोकांनी विरोध केला. सरकारी जागेवर अतिक्रमण करून शेती वहीवाट



करत पवारवाडी तांड्यातील स्मशानभूमीच्या जागेची शासकीय नोंद असून सुद्धा तिथे अंत्यसंस्कारला विरोध करण्यात आला असल्याचे मत येथील ग्रामस्थांनी व्यक्त केले. नातेवाईकांकडून महसूल प्रशासन व पोलिस प्रशासनाला सदरील घटनेची माहिती देण्यात आली होती परंतू महसूल प्रशासनाचा एकही अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी फिरकला नाही. तर पोलीस मात्र घटनास्थळी उशिरा पोहचले होते. तर अर्धवट बांधलेल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कारला काही लोकांनी विरोध केल्याने स्मशानभूमी शेजारी असलेल्या जागेवर सदरील मयतावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# परळी विधानसभेतील त्या मतदान केंद्रावर योग्य ती खबरदारी घेण्याचे-उच्च न्यायालयाचे निर्देश

**प्रतिनिधी । परळी**

परळी विधानसभा मतदारसंघातील १२२ मतदान केंद्रे अति संवेदनशील घोषित करून त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावून २४ तास वीज पुरवठा अखंडित सुरळीत चालू ठेवावा त्या अति संवेदनशील मतदान केंद्रावर सी आर पी एफ केंद्रीय पोलीस राखीव दल साईनाथ करण्याची विनंती करणारी याचिका क्रमांक ११ ८४१/२०२४ माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे एडवोकेट. वसंतरावजी साळुंखे व तसेच एडवोकेट. श्रीनिवास आबाड यांच्यामार्फत आडवोकेट माधव जाधव यांनी दाखल केली होती. सदर याचिकेच्या सुनावणीच्या वेळी मा.



उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी महाराष्ट्र राज्याचे निवडणूक आयुक्त व महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांना नोटीस काढून दोन दिवसांमध्ये शपथपत्र दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले. या याचिकेची सुनावणी २५ ऑक्टोंबर २०२४ रोजी ठेवण्यात आली होती. त्यानुसार निवडणूक आयोगाने माननीय उच्च न्यायालयाची शपथपत्र सादर करून परळी विधानसभा मतदारसंघातील आरती संवेदनशील मतदान टकेंद्रावर ही खबरदारी घेण्याचे व ही विधानसभा बाहेर राज्यातील आयपीएस आयएएस दोन अधिकारी हे ऑबजर्व म्हणून नियुक्ती करावी त्यांच्यामार्फत पाहणी करून या विधानसभा मतदारसंघातील अति संवेदनशील मतदान केंद्रावरील खबरदारी त्या ठिकाणी येणाऱ्या विधानसभेमध्ये अतिशय योग्य ती खबरदारी घेण्याचे मोकळ्या व कोणत्याही दबावाला बळी न पडता लोकशाही नेमाने मतदान घेऊन आश्वासन खात्री व आम्ही उच्च न्यायालयाने शपथपत्राद्वारे आली होती त्यानुसार माननीय उच्च न्यायालयाने दिनांक २५ ऑक्टोबर २०२४ रोजी या याचिकेमध्ये सुनावून घेऊन निवडणूक आयोगाला निर्देश दिले आहेत. याचिकाकर्ते एडवोकेट माधव जाधव यांनी दिलेल्या तक्रारी अर्जामध्ये जी मतदान केंद्रे संवेदनशील योग्य ती खबरदारी घेण्याचे कलोरा मॅपिंग २०२३ सर्व नियमाचे तंतोतंत पालन करण्याचे आदेश माननीय उच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले आहे. याचिका करते एडवोकेट वसंतरावजी साळुंखे व श्रीनिवास अंबड यांनी अतिशय खंबीरपणे बाजू मांडली लोकशाही वाचवण्यासाठी फार मोठे मोलाचे योगदान दिले आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे येणाऱ्या विधानसभेमध्ये परळी विधानसभा मतदारसंघांमध्ये बोगस मतदान होण्याची शक्यता कमी झाली आहे त्यामुळे सत्ताधाऱ्यांचे धाबे धनोनले आहे .

# माजलगाव विधानसभा निवडणूक अपक्ष लढवणार - प्रा.ईश्वर मुंडे

**प्रतिनिधी । धारूर**

देशाचे नेते पद्म विभुषण खा.शरदचंद्र पवार साहेब व प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी पदावरून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात घारूर तालुकाक्षध्य,ओबीसी सेल प्रदेश सरचिटणीस,सेवा निवृत्त अधिकारी सेल राज्य प्रमुख या पदावर पक्षाचे सक्रीय काम करून खा.शरदचंद्र पवार साहेबांचे व पक्षाचे विचार वाडी,वस्ती, तांडच्यापर्यंत पोहचवले.सन.२०१९ ला माजलगाव मतदार संघाचा आमदार निवडून आनला.पक्ष फुटल्यानंतर ही निष्ठेने खा.शरदचंद्र पवार साहेबांच्या पक्षातच राहीलो.८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करून जन सामान्यांच्या मनात घर केलेले आहे.



मागे सन २०२१ ला छत्रपती संभाजी नगर पदवीधर मतदार संघात उमेदवारी मागणी केलेली होती,२०२४ ला बीड लोकसभा मतदार संघात जनसंपर्क वाढवून बीड लोकसभेच्या उमेदवारीची मागणी केलेली होती.वरील दोन्ही वेळी मला पक्षाने आपला नंतर विचार करू असे सांगून थांबवले.

आता सन २०२४ च्या माजलगाव विधानसभा निवडणूकीसाठी पक्षाकडे रितसर उमेदवारीची मागणी करून माजलगाव मतदार संघातील शंभर गावात जन संवाद दौरा करून पक्षाचे कार्य वाढवलेले आहे.माझ्या परिचय पत्राच्या पन्नास हजार प्रति मतदार संघातील सर्व गावांमध्ये वाटप केलेल्या आहेत.

या वेळी माजलगाव मतदार संघात माझ्या विषयी मतदारांमध्ये सहानुभूती असून पक्षाने आपणास संधी द्यावी अशी जन भावना होती. या मुळे मी निश्चित निवडणूक जिंकू शकत होतो.परंतू असे न होता मला पक्षाने निवडणूक लढण्याची संधी व तिकीट दिले नाही.या मुळे मतदार संघातील जनता नाराज झालेली असून तुम्ही अपक्ष निवडणूक लढवावी आम्ही तुमच्या पाठीशी आहेत हा दबाव माझ्यावर वाढत असल्यामुळे मी माजलगाव विधानसभा मतदार संघ निवडणूक - २०२४ जनतेच्या विश्वासावर अपक्ष लढवणार असून सोमवार दि.२८ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता माझा उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT